8 JUL 2018 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यटन अभ्यासक्रमातून संधीची दारे खुली

## शिवाजी विद्यापीठामध्ये प्रवेश सुरू

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
हल्ली जगभर पर्यटन व्यवसाय जोमाने वाढला आहे. राज्यातही अनेक ठिकाणे पर्यटनस्थळे म्हणून प्रसिद्धी पावत आहेत, अशा पर्यटनस्थळी योग्य प्रशिक्षित मनुष्यबळाची सध्या कमतरता जाणवते. त्यामुळे टुरिझम व ट्रॅव्हलच्या अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांची पसंती मिळत आहे. शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागातही अशाच प्रकारच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश सुरू असून, या अभ्यासक्रमाच्या पूर्ततेनंतर नोकरी तसेच स्वतःचा व्यवसाय करता येणार आहे.

जगभरातील विविध ठिकाणी फिरायला जाणे या गोष्टी आता समाजात रूळत आहेत. वर्षातून किमान एक वेळा आपल्या कुटुंबासोबत, तर मित्रमंडळीसोबत अनेकजण पर्यटनासाठी बाहेर पडतात. त्यामुळे अनेक ठिकाणे पर्यटनस्थळे म्हणून प्रसिद्धी पावत आहेत, तर काही ठिकाणे ही देवदर्शनाबरोबरच पर्यटनाचा आनंदही देतात. सध्या अतिशय वेगाने वाढणारा व्यवसाय म्हणून पर्यटन व्यवसायाकडे पाहिले जाते. कोल्हापूरमध्येही मोठ्या प्रमाणात पर्यटनाला चालना देण्यासाठी उपक्रम घेतले जात आहेत.

मात्र बाहेरगावी गेल्यानंतर तेथील माहिती नसल्याने अनेकांना अडचणींचा सामना करावा लागतो. अशा वेळी एखाद्या ट्रॅव्हल एजन्सीला ती जबाबदारी दिली की, अनेक प्रश्न अगदी सहजपणे सुटतात.

### नोकरी, व्यवसायाच्या संधी



सध्या पर्यटन क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळेया क्षेत्रात कुशल मनुष्यबळ पुरविणाऱ्या अशा अभ्यासक्रमांची नितांत आवश्यकता होती. या अभ्यासक्रमामुळे १०० टक्के नोकरी आणि स्वयंरोजगाराची संधी विद्यार्थ्यांना मिळते. शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागात अत्यंत कमी फीमध्ये हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे.

**- डॉ. डी. एच. पवार**
अभ्यासक्रम समन्वयक, विद्यापीठ

▶▶ पान २ वर

## पर्यटन अभ्यासक्रमातून संधीची दारे खुली

त्यामुळे वर्षापासून ट्रॅव्हल अँड टुरिझमचा व्यवसाय भरभराटीला आला असून, पर्यटन मार्गदर्शकांची संख्या वाढली आहे. मुलींनाही या क्षेत्रात भरपूर संधी आहे. देशात दरवर्षी ४० लाखांपेक्षा अधिक पर्यटक येतात. त्यामुळे या क्षेत्रामध्ये व्यवसाय करण्यासाठी खूप संधी उपलब्ध झाल्या आहेत. ट्रॅव्हल एजन्सीज, हॉटेल, गाईड, हवाई प्रवासाची सोय करणारे एजंट इत्यादी अनेक रोजगार आणि व्यवसाय या क्षेत्रामध्ये उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे या क्षेत्रातील नोकरी आणि व्यवसायाच्या संधी लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागात २००५ पासून एक वर्ष मुदतीचा पर्यटन व प्रवास (डिप्लोमा इन टुरिझम व ट्रॅव्हल) पदविका अभ्यासक्रम सुरू केला आहे. या अभ्यासक्रमाद्वारे पर्यटन क्षेत्रात उत्तम करिअर करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. कोणत्याही शाखेचा पदवीधर या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतो. यापूर्वी हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात आपली ओळख निर्माण केली आहे.

येथील अनेक विद्यार्थ्यांनी आपले स्वतःचे पर्यटन केंद्र सुरू केले आहे, तर काही विद्यार्थी आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे पर्यटन सल्लागार आहेत. हॉटेल क्षेत्रात तसेच पर्यटन मार्गदर्शक म्हणूनही येथील अनेक विद्यार्थी पर्यटन क्षेत्रात कार्यरत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापू
8 JUL 2018
पुण्यनगरी

# टूरिझम, ट्रॅव्हल अभ्यासक्रमासाठी प्रवेशाचे आवाहन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** विद्यापीठातील भूगोल अधिविभागात २००५ पासून एक वर्ष मुदतीचा पर्यटन व प्रवास (डिप्लोमा इन टूरिझम व ट्रॅव्हल) पदविका अभ्यासक्रम सुरू आहे. या अभ्यासक्रमाद्वारे पर्यटन व आदरातिथ्य क्षेत्रात उत्तम करिअर करण्याची संधी प्राप्त झाली आहे. अभ्यासक्रम हा एक वर्ष मुदतीचा असून, कोणत्याही विद्याशाखेचा पदवीधर प्रवेश घेऊ शकतो. या अभ्यासक्रमाची फी ११ हजार २७४ रुपये आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनी चांगल्या नोकरीसोबतच स्वतःचे व्यवसायही सुरू केले आहेत, तर काही विद्यार्थी आंतरराष्ट्रीय विमानतळावर पर्यटन सल्लागार आहेत. अभ्यासक्रमासाठी प्रवेशाची अंतिम तारीख ३१ जुलै असून, अभ्यासक्रमाच्या अधिक माहितीसाठी अभ्यासक्रम समन्वयक डॉ. डी. एच. पवार यांच्याशी भूगोल अधिविभागात संपर्क साधण्याचे आवाहन विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
'8 JUL 2018
Times of India

# Applications invited for travel and tourism course

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has invited applications for one-year travel and tourism certificate course with the last date for submitting forms being July 31.

The university circular, dated July 6, stated that the course was started at the Department of Geology from the year 2005 and has received good response from the students over the years.

"The pre-requisite for the course is nothing but a student has to be a graduate from any field. The course fee has been set at Rs 11,274, which is very low when compared to the courses conducted by private institutes. Students who were earlier enrolled for this course are now employed in various travel and tourism-related fields," said the circular.

It added that few students have started their own travel and tourism agency, while few are working in the field of hospitality.

Interested students can contact course coordinator D H Pawar on 9850146372 for more information about the course. TNN

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JUL 2018
Times of India

# SUK invites research proposals from UG pupils

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has invited research proposals from the final year under-graduate students by September 15, under the special research sensitization scheme.

The scheme, according to varsity officials, was started last year to boost the research culture among students. The proposals invited will be first scrutinised by the colleges at the preliminary level and then will be forwarded to the lead college in their cluster.

A circular, dated July 5, said, "A research grant of Rs 10,000 maximum per project will be given to the concerned college for meeting the expenditure. The lead college will also organise guidance workshop for the concerned students in which the experts will orient the students for smooth conduct of the project."

The submission of those proposals to the lead college will have to be done by September 30. A workshop on October 15 is scheduled for the participants. The final project will have to completed and submitted by January 15, next year.

It added, "Recently it is felt that the scope of the scheme be enhanced by incorporating initial research component in it. Usually students get exposure to the research activity after completion of their master's programme. It will be good if undergraduate students are given some exposure and training as far as research activity is concerned. With this view to support research projects for undergraduate students, the present scheme is being introduced through lead college scheme."